महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जा.क्र. : तंशिविकापु/विवि/प्रवेश गुणवत्ता यादी तपासणी २०२०-२१/२०२१/ 1022 दिनांक : 25 FEB 2021

महत्वाचे परिपत्रक (गुणवत्ता यादी तपासणी)

प्रति,
प्राचार्य/संचालक,
शासकीय, अशासकीय अनुदानित व खाजगी विनाअनुदानित
पदवी, पदव्युत्तर पदवी, अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/
व्यवस्थापनशास्त्र/वास्तुशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्था,
पुणे विभाग

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील संचालनालयांतर्गत असलेल्या व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमात प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यतेची प्रक्रिया**

**संदर्भ : १) महाराष्ट्र विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २००५ दिनांक १७/०८/२०१५**
**२) मा.सचिव , प्रवेश नियामक प्राधिकरण यांचे पत्र क्रमांक संकीर्ण /२२२१/प्र.क्र.०१/प्रनिप्रा/१८६ दिनांक ०८/०२/२०२१**
**३) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र जा.क्र.२ अ/एडीएग/२०२१/८७ वि. ११.०२.२०२१.**

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील संचालनायातर्गत असलेल्या व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम ९(५) च्या तरतुदीनुसार प्रवेशित विद्यार्थ्यांच्या मान्यतेबाबतची कार्यपध्दती विहीत करण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता या कार्यालयाच्या अधिनस्त सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित, विद्यापीठ विभाग, विद्यापीठ नियंत्रित संस्था, खाजगी विना अनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यतेची तपासणी करण्याकरीता मा संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी संदर्भ क्रमांक ३ च्या पत्रान्वये या सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना प्राधिकृत केले आहे.

कोव्हीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे या विभागीय कार्यालयांतर्गत येणा-या जिल्ह्यांमधील संस्थांच्या शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील **पदवी व पदव्युत्तर पदवी** अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व्यवस्थापनशास्त्र, वास्तुशास्त्र इत्यादी अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांचे गुणवत्ता यादी पडताळणी संबंधित जिल्ह्यातील शासकीय/अशासकीय अनुदानित संस्थांमध्ये करावयाचे आहे.

सर्व संस्थांना सूचित करण्यात येते की, सोबत जोडलेल्या यादीमधील आपल्या संस्थेच्या नावासमोर दर्शविलेल्या तपासणी केंद्राने निर्धारीत केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे प्रवेश प्रक्रीयेसंदर्भात काम करणारे अधिकारी व कर्मचा-यांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित रहावे. सदर प्रवेश/गुणवत्ता यादी तपासणीसाठी उमेदवारांची सर्व आवश्यक मूळ कागदपत्रांसोबत Receipt cum Acknowledgment of Confirmation of Admission (Institute Reporting) ची प्रिंट घेऊन यावी. तसेच प्रवेश यादी पडताळणीसाठी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या संकेतस्थळावरील संस्थेतील प्रवेशित विद्यार्थ्यांची यादीची प्रिंट १ प्रतीत (प्राचार्यांचे नाव/सही शिक्क्यासह) घेऊन यावी. राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या संकेतस्थळाव्यतिरिक्त अन्य यादी (उदाहरणार्थ MS Word File etc.) पडताळणीसाठी स्विकारली जाणार नाही.

तरी सर्व संस्थांनी त्यांना नेमून दिलेल्या तपासणी केंद्रांकडून आपली गुणवत्ता यादी तपासून घेतल्यानंतर या विभागीय कार्यालयाकडून तपासणी प्रमाणपत्र प्राप्त करणेकरीता सोबत जोडलेल्या चेकलिस्टनुसार कागदपत्रांसह दिनांक १५.०३.२०२१ पुर्वी या विभागीय कार्यालयाकडे संपर्क साधावा. या कार्यालयाने पडताळणी केलेल्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या याद्या संचालनालयास या विभागीय कार्यालयामार्फत सादर करण्यात येतील. तसेच संचालनालयाकडून मान्यता मिळाल्यानंतर सदर गुणवत्ता यादी अंतिम मान्यतेकरीता प्रवेश नियामक प्राधिकरणास या विभागीय कार्यालयाकडून प्रमाणित केल्यानंतर दोन महिन्याच्या कालमर्यादेत प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे प्रवेश प्रक्रिया शुल्कासह सादर करण्याची जबाबदारी संबंधित संस्थांची राहील. **प्रवेश पडताळणी अहवाल संचालनालयामार्फत सादर झाल्याशिवाय शैक्षणिक २०२०-२१ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमातील प्रवेशांना प्रवेश नियामक प्राधिकरणाची अंतिम मान्यता प्रदान होणार नाही. त्याअनुषंगाने विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत भविष्यात कोणताही अनुचित प्रकार घडल्यास त्यास सर्वस्वी संस्थाप्रमुख जबाबदार राहतील.**

(डॉ.द.व्यं. जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीसाठी (कार्यासन क्र. २ अ)

# चेकलिस्ट

संस्थेचे संपूर्ण नाव व डीटीई कोड : ____________________

प्राचार्याचे नाव व मोबाईल नंबर : ____________________

संस्थेचा फोन (लॅन्डलाईन) नंबर : ____________________

गुणवत्ता यादी तपासण्यासाठी आलेल्या प्रतिनिधीचे नाव व मोबाईल नंबर : ____________________

| अक्र | तपशिल | आहे/नाही |
|---|---|---|
| १ | प्रवेश नियामक प्राधिकरण मुंबई यांचे संकेत स्थळावर अपलोड केलेली प्रथम, थेट द्वितीय वर्षाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांची शाखानिहाय यादीची प्रिंट १ प्रतीत (प्राचार्याचे नाव/सही शिक्क्यासह), राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या संकेतस्थळाव्यतिरिक्त अन्य यादी (उदाहरणार्थ MS Word File etc.) पडताळणीसाठी स्विकारली जाणार नाही. (तपासणी केंद्रामार्फत तपासणी झालेली) | |
| २ | प्रवेश यादी पडताळणीसाठी सादर करताना संस्थेस सक्षम प्राधिकरणाची पीसीआय/एआयसीटीई/सीओए/मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई व महाराष्ट्र शासन यांचे परवानगी/प्रवेश क्षमता वाढ व तुकडी वाढ (LOA) परवानगी बाबतचे पत्र. | |
| ३ | शै. वर्ष २०२०-२१ मध्ये नव्याने सुरु झालेल्या संस्थांची प्रथम वर्षाकरीताची तसेच नवीन अभ्यासक्रम वाढ केल्याबाबत संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई व संस्थाप्रमुख यांची संयुक्त नावे आवश्यक रकमेची मुदतठेव पावती/प्रमाणपत्राची प्राचार्यांनी सांक्षांकीत केलेली छायांकीत प्रत. | |
| ४ | शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये ज्या संस्थांना थेट अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडून प्रवेश क्षमता वाढ/घट या परवानगी देण्यात आलेली आहे अशा संस्थांनी शासनास भरणा करावयाचे नोंदणी शुल्क भरल्याची पावती सादर करावी. तसेच शुल्क भरले नसल्यास सदर शुल्क धनाकर्षाद्वारे या विभागीय कार्यालयास जमा करावे. | |
| ५ | संस्थास्तरावरील आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर शिल्लक राहिलेल्या जागांवर (ACAP) प्रवेशाकरिता संबंधित संस्थेने संकेतस्थळावर प्रसिध्द केलेली जाहिरात, अर्ज मागविण्यासाठी कालावधी, प्राप्त अर्जांची गुणवत्ता यादी, प्रवेशित विद्यार्थ्यांचे गुणवत्तेनुसार प्रवेश केले आहेत याबाबतची कागदपत्रे. | |
| ६ | संस्थेतील अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे तसेच संस्थास्तरावरील प्रवेश निश्चित करताना उमेदवारांच्या प्रवेशाच्या संबधीत सर्व कागदपत्रांची संस्थेच्या प्राचार्यांनी/संस्थाप्रमुखांनी आवश्यक ती पडताळणी केलेली असल्याचे संस्थाप्रमुखांनी प्रमाणित केलेल पत्र प्रवेशित विद्यार्थ्यांच्या यादीसोबत जोडणे आवश्यक आहे. | |
| ७ | शुल्क परताव्यासंबंधी संस्थेबद्दलच्या तक्रारींची संस्थाप्रमुखांनी दखल घेऊन त्यांचे निराकरण करावे व शुल्क परतावा बाबत कोणतीही तक्रार नसल्याचे प्रमाणपत्र संस्थेच्या प्राचार्यांनी प्रवेश यादी पडताळणी वेळी सादर करावे. | |
| ८ | अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त संस्थांनी त्यांना अल्पसंख्यांक विकास विभागाने प्रदान केलेल्या अल्पसंख्यांक दर्जा प्रमाणपत्र (वैध कालावधीचे) मूळ प्रत व संस्थाप्रमुखांनी साक्षांकीत केलेली प्रत प्रवेश यादी पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे. तसेच शैक्षणिक वर्ष २०१८-१९ व २०१९-२० मधील मंजूर प्रवेशित याद्यांची छायाप्रत. | |
| ९ | शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी शिक्षण शुल्क निर्धारीत केल्याबाबतचे सन २०२०-२१ चे पत्र. | |
| १० | एखादया विशिष्ट प्रकरणी आपल्या संस्थेस मा. सर्वोच्च न्यायालयाने काही निर्देश दिलेले असल्यास त्याबाबतची कागदपत्रे. | |
| ११ | प्रवेशीत विद्यार्थ्यांच्या यादीमधील अनुक्रमांकानुसार विद्यार्थ्यांची मुळ कागदपत्रे तपासण्यासाठी लावण्यात यावीत - Receipt cum Acknowledgment of Confirmation of Admission, शैक्षणिक गुणपत्रिका, शाळा सोडल्याचा दाखला, जातीचे प्रमाणपत्र, नॉन-क्रीमीलेअर प्रमाणपत्र (दि. ३१ मार्च २०२१ पर्यंत वैध व विहीत मुदतीत प्राप्त झालेले असावे), अधिवास/राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, शैक्षणिक खंड असल्यास - गॅप प्रमाणपत्र, EWS उमेदवारांसाठी विहित नमुन्यातील प्रमाणपत्र, TFWS उमेदवारांसाठी उत्पन्नाचा दाखला आवश्यक राहील. (मुळ प्रमाणपत्रांखेरीज कोणतेही झेरॉक्स प्रती व अनावश्यक कागदपत्रे मुळ प्रमाणपत्रासोबत जोडण्यात येऊ नयेत.) | |

विभागीय कार्यालयामधील तपासणी करणा-या
अधिका-याचे नाव व स्वाक्षरी

टिप - सदर चेकलिस्ट प्रमाणे फाईल तयार करुन चेकलिस्ट फाईलवर चिकटविण्यात यावी.

# संस्थेचे लेटरहेड

जावक क्रमांक दिनांक

संस्थेचा डीटीई कोडः

## शैक्षणिक वर्ष २०२०-२१ प्रवेशासंबंधीत कागदपत्र पडताळणी प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ च्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये व संस्थास्तरावरील प्रवेश प्रक्रियेमध्ये ____________________(संस्थेचे नाव व डीटीई कोड) या संस्थेमध्ये प्रथम/ थेट द्वितीय वर्ष पदवी/पदव्युत्तर पदवी अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/एच.एम.सी.टी./व्यवस्थापन शास्त्र/वास्तुशास्त्र अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अर्हते संबंधीची आवश्यक मूळ कागदपत्रे / प्रमाणपत्रे **(शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने दिनांक ०८.१०.२०२० असाधारण राजपत्र क्रमांक २३५ अन्वये प्रसिध्द केलेली अर्हता तसेच पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या माहिती पुस्तिकेमध्ये नमूद केलेली अर्हता याप्रमाणे)** यांची पडताळणी केलेली असून ती बरोबर आहेत. तसेच राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, म.रा. मुंबई यांचे दिनांक २५.०१.२०२१ च्या परिपत्रकानुसार शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी ज्या उमेदवारांनी EWS, NCL आणि CVC/TVC प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यासाठी पावती सादर केली होती व अशा उमेदवारांना ज्या प्रवर्गातून जागा वाटप झालेले आहे त्या प्रवर्गातून संस्थेत तात्पुरता प्रवेश देण्यात आला होता. अशा उमेदवारांकडून संबंधीत अभ्यासक्रमांची केंद्रिभूत प्रवेश प्रक्रिया संपण्याच्या अंतिम दिनांकाच्या आत मूळ प्रमाणपत्र सादर केलेले आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | केंद्रिभूत प्रवेश प्रक्रिया संपण्याचा अंतिम दिनांक |
|---|---|---|
| १ | प्रथम व थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रम. | ३०.०१.२०२१ |
| २ | प्रथम वर्ष व थेट द्वितीय औषधनिर्माणशास्त्र / फार्म डी. /वास्तूशास्त्र / एम.ई. / एम.टेक. / एम. आर्च / एम.फार्म. | २९.०१.२०२१ |
| ३ | प्रथम वर्ष एच.एम.सी.टी. / एम.सी.ए. | २८.०१.२०२१ |
| | व्यवस्थापनशास्त्र (एम.बी.ए.) | ३१.०१.२०२१ |

संस्थेचे सील

प्राचार्य
नाव व स्वाक्षरी

..Yogesh Kelkar\Admission 2020-21\Degree Admission\Merit list\Merit list letter and cirucular.docx

<u>संस्थेचे लेटरहेड</u>

जावक क्रमांक                                                                                                   दिनांक

संस्थेचा डीटीई कोडः

## शुल्क परताव्याबाबत तक्रार नसल्याचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ च्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये व संस्थास्तरावर प्रवेश प्रक्रियेमध्ये ______________________________ (संस्थेचे नाव व डीटीई कोड) या संस्थेमध्ये संस्थेमध्ये प्रथम / थेट द्वितीय वर्ष पदवी / पदव्युत्तर पदवी अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र  एच.एम.सी.टी. / व्यवस्थापन शास्त्र / वास्तुशास्त्र या अभ्यासक्रमास  प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क परताव्याबाबत आज दिनांक __________ पर्यंत संस्थेकडे कोणतीही तक्रार नाही.

संस्थेचे सील

प्राचार्य
नाव व स्वाक्षरी